**महाराष्ट्र शासन**
**वनविभाग**
**मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे वनवृत्त, ठाणे**

---

**वनरक्षक भरती प्रक्रिया २०१६**

## <u>सूचना</u>

ठाणे वनवृत्तातील वनरक्षक संवर्गातील अनुसूचित क्षेत्र (ठाणे व पालघर जिल्हा) व बिगर अनुसूचित क्षेत्रातील रिक्त पद भरतीप्रक्रियेअंतर्गत उमेदवारांची स्पर्धात्मक धावण्याची चाळणी चाचणी दिनांक **दि. ०५/११/२०१६ ते दि. १०/११/२०१६** यां कालावधीत घेणेत आली आहे.

सदर स्पर्धात्मक धावण्याच्या चाळणी चाचणीचा निकाल सोबत प्रसिध्द केला आहे. तसेच स्पर्धात्मक धावण्याच्या चाळणी चाचणीनंतर पुढील फेरीसाठी शारीरिक मोजमाप तपासणीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी स्वतंत्रपणे सोबत प्रसिध्द केली आहे.

सदर धावण्याच्या चाळणी चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या (३० मिनिटांचे आंतील सर्व) उमेदवारांची शारीरिक मोजमाप तपासणी **दि. २८.११.२०१६ ते दि. ०३.१२.२०१६** या कालावधीत सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे वनवृत्त, ठाणे कार्यालय, मायक्रो वेव्ह टॉवर, बारा बंगला एरिया, कोपरी, ठाणे (पूर्व) - ४००६०३ येथे घेण्यात येणार आहे.

सदर शारीरिक मोजमाप तपासणीकरीता खालीलप्रमाणे सूचनांचे उमेदवारांनी काटेकोरपणे पालन करावे.

१. उमेदवारांनी सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार शारीरिक मोजमाप तपासणीकरीता नमुद तारखेस व नमूद केलेल्या वेळेपूर्वी १ तास अगोदर उपस्थित रहावे. कोणत्याही कारणास्तव निश्चित तारखेव्यतिरिक्त इतर वेळी उमेदवारांची शारीरिक मोजमाप घेतले जाणार नाही. गैरहजर राहणारे उमेदवार पुढील फेरीसाठी अपात्र ठरतील याची कृपया नोंद घ्यावी.

२. सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार नमूद तारखेस फक्त उमेदवारांची शारीरिक मोजमापे घेतली जाणार आहेत. कोणतेही प्रमाणपत्र/कागदपत्र तपासणी करणेत येणार नाहीत, सबब उमेदवारांनी त्यांची प्रमाणपत्रे समवेत आणू नयेत.

३. उमेदवारांनी उपरोक्त शारीरिक मोजमापाकरीता येताना मे. महाऑनलाईन लिमिटेड या संस्थेच्या संकेतस्थळावरुन देण्यात आलेल्या ओळखपत्राची (Admit Card) प्रत समवेत आणावयाचे आहे. अशा ओळखपत्राशिवाय (Admit Card) उमेदवारांची शारीरिक मोजमापे घेतली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. तसेच उमेदवाराने स्वत:ची ओळख पटविणेकरीता खालीलपैकी कोणतेही एक मूळ ओळखपत्र व त्याची स्वतः स्वाक्षांकीत केलेली छायांकीत प्रत (झेरॉक्स) सोबत आणावी.
१. आधार कार्ड २. पॅन कार्ड ३. मतदान ओळखपत्र ४. शाळा/कॉलेज यांनी अदा केलेले ओळखपत्र ५. वाहन परवाना इ.

वनरक्षक भरतीकरीता दिनांक २६/०९/२०१६ रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेल्या वेळापत्रकात निर्धारित केल्यानुसार कार्यक्रमात बदल करणेत येत आहे याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. <u>त्यानुसार वनरक्षक भरती प्रकियेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या पुढील टप्प्यांवरील कार्यक्रमाबाबतच्या सूचना मे. महाऑनलाईन लिमिटेड या संस्थेच्या http://maharecruitment.mahaonline.gov.in व वनविभागाच्या http://mahaforest.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करणेत येतील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.</u>

ठिकाण :- ठाणे

दिनांक :- २२/११/२०१६

अध्यक्ष,
प्रादेशिक निवड समिती
तथा
मुख्य वनसंरक्षक (प्रा.),
ठाणे वनवृत्त, ठाणे